# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.02.2025** **वार-रविवार**

---

**विश्वमराठी**

पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात गेले तीन दिवस सुरू असलेल्या विश्व मराठी संमेलनाची सांगता आज होत आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री उदय सामंत यांच्यासह विविध मान्यवर या सांगता सोहळ्यात सहभागी होणार आहेत, याच समारंभात प्रसिद्ध अभिनेता रितेश देशमुख यांना सन्मानित केलं जाईल. या संमेलनात झालेले विविध परिसंवाद, चर्चासत्र, तसंच सांस्कृतिक कार्यक्रमांना रसिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

**अवचटपुरस्कार**

मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राच्या संस्थापक डॉ. अनिता अवचट यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी दिला जाणारा संघर्ष सन्मान पुण्यातील ‘पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटर’ या संस्थेला आज ज्येष्ठ चित्रकार अन्वर हुसेन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात तोंडाने चित्र काढणारे मृदुल घोष यांना डॉ. अनिल अवचट स्मृती सृजन सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. आयुष्यात अचानक आलेल्या अपंगत्वाचं आव्हान सकारात्मकतेनं स्वीकारून त्यातून सृजनाच्या वाटा निर्माण करणाऱ्या या यशोगाथा नव्या पिढीसमोर येणं आवश्यक आहे, असं मत अन्वर हुसेन यांनी यावेळी व्यक्त केलं. ज्येष्ठ मनोविकार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**आयुर्वेद**

पिंपरीच्या डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठानं; वैद्यकीय क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल अमेरिकेतील न्यूरोसायंटिस्ट डॉ. टोनी नेडर आणि आयुर्वेदतज्ज्ञ डॉ.सदानंद सरदेशमुख यांना मानद डॉक्टरेट देऊन नुकतंच सन्मानित केलं. डॉ.टोनी नेडर यांनी वेदिक संस्कृती, आयुर्वेद यासंबंधित केलेलं कार्य आणि डॉ.सदानंद सरदेशमुख यांनी आयुर्वेद आणि आधुनिक शास्त्राची सांगड घालत कर्करोगासारख्या दुर्धर आजारावर केलेलं कार्य आदर्श असल्याचं कुलपती डॉ.पी.डी.पाटील यावेळी म्हणाले.

**जीबीएस**

पुणे शहरात जीबीएस या आजाराच्या रुग्णांची संख्या १४९ झाली आहे.या आजारातून बरे झालेल्या पाच रुग्णांना आज ससून रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं. सध्या ससून रुग्णालयात जीबीएस आजाराचे 28 रुग्ण आहेत.

**<u>१०८रुग्णीवाहिका</u>**

प्रसूतिकळा सुरू झालेल्या महिलांना राज्य शासनाची मोफत 'डायल १०८' रुग्णवाहिका उपयुक्त ठरत आहे. गेल्या दहा वर्षांत पुणे, पिंपरी चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील १ लाख ५० हजार गर्भवती महिलांना रुग्णवाहिकेची सेवा देण्यात आली. त्यापैकी ३ हजार ६९५ गर्भवतींची प्रसूती या रुग्णवाहिकेतच करण्यात आल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक डॉक्टर प्रियांक जावळे यांनी दिली.

**<u>मेट्रो</u>**

पुणे मेट्रोनं जिल्हा न्यायालय स्थानकामध्ये स्तनदा मातांसाठी मातृशक्ती नर्सिंग पॉड सुरू केले आहेत. याचं लोकार्पण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते आज झालं. सोशल थम फाऊंडेशनच्या सहयोगाने हे नर्सिंग पॉड बसवण्यात आले आहेत. हे पॉड एका ठिकाणाहून दुसरीकडे अतिशय सहजपणे हलवता येऊ शकतात. तसंच त्यात वातानुकूलन यंत्रणादेखील आहे.

**<u>पुणेस्वच्छता</u>**

सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरवणाऱ्या ७ हजार ५९३ बेशिस्त नागरिकांकडून पुणे महापालिकेने गेल्या महिन्यात ६० लाख २९ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाने सर्वाधिक ९ लाख १९ हजार २५८ रुपयांचा दंड वसूल केला असल्याचं महापालिकेचे उपायुक्त आणि घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी सांगितलं.

दरम्यान पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत साप्ताहिक स्वच्छता मोहीम राबवण्यात येत आहे. या अंतर्गत दर शनिवारी शहरातील सर्व धार्मिक आणि पर्यटन स्थळे, सामुदायिक सार्वजनिक शौचालये, भाजी मंडई, मुख्य चौक, स्मारक उद्यान आणि महापुरूषांच्या पुतळ्यांच्या परिसरात स्वच्छता केली जाते. काल झालेल्या मोहिमेत महापालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसह अनेक स्वयंसेवी संस्थांनीही सहभाग घेतला.

**<u>मानवीसाखळी</u>**

आपल्या विविध मागण्यांसाठी पुण्याच्या कर्वेनगर संघटित सोसायटी मंचाच्या 12 शे लोकांनी डीपी रस्त्यावर मानवी साखळी तयार करून आंदोलन केलं. कर्वेनगर परिसरातील विविध समस्या दूर कराव्यात आणि राजाराम पूल ते आंबेडकर चौक हा डीपी रोड पूर्ण झाल्याशिवाय नदीवरील नवा पूल सुरू करू नये, या प्रमुख मागण्यासांठी हे आंदोलन करण्यात आलं.

**<u>निर्मिती</u>**

अध्यात्मिक  गुरू प पू .दिघे मावशी  यांच्या विचारांनी प्रेरित असलेल्या 'निर्मिती ' ग्रुपतर्फे घेण्यात आलेल्या  'क्रिएटिव्ह माईंड्स ' या आंतरशालेय विविध स्पर्धाचा बक्षीस वितरण समारंभ आज पुण्यातील मुक्तांगण शाळेच्या सभागृहात पार पडला. मुलींच्या नूतन मराठी विद्यालयाला आणि बाबूराव घोलप शाळा यांना विभागून प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले.विद्यार्थ्यांनी कलागुणांवर प्रेम करावे.या ध्यासातून त्यांना आणखी मोठे होता येईल अशा शब्दात परमपूज्य दिघे मावशी यांनी विजेत्यांना आशीर्वाद दिले. संजीव दिघे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**<u>बाजारसमिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी घटल्याने आलं, लसूण, मटार ,सिमला मिरची, आणि काकडीच्या भावात घसरण झाली.तर कोथिंबीर आणि चवळीमध्ये किंचित वाढ झाली. फुल बाजारात झेंडूची आवक घटल्याने आणि मागणी वाढल्याने भाव वधारले आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल तापमान ३५ अंश तर किमान तापमान १४ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या किमान तापमानात किंचित वाढ तर आकाश निरभ्र राहण्याची शक्यता असल्याचं पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**